<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२०/२०११ मधील नि.क्र.१२३ वरील आदेश</u>

<u>(प्रविण उपाध्ये विरुध्द सुभाष उपाध्ये)</u>

**CNR No.MHSN02-001423-2011**

१. वादी यांनी मुळ दावा वाटपासाठी, कब्जासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादी नं.१७ नलिनी उर्फ पुष्पावती अशोक चिमाण्णा यांचे दिनांक ०८/०३/२०१५ रोजी निधन झालेले आहे. त्यामुळे त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेण्यासाठी जो विलंब झालेला आहे तो माफ करुन मिळण्याकरीता, तसेच याकामी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात नमूद केलेले नाही. केवळ मोघम विधाने केली आहेत. त्यामुळे वादी यांच्यावर ५०००/- रुपये कॉस्ट बसविण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

३. निर्विवादपणे दाव्याचे स्वरुप पाहता दावा वाटपासाठी, कब्जासाठी व निरंतर ताकीदीसाठी असल्यामुळे प्रतिवादी नं.१७ नलिनी उर्फ पुष्पावती अशोक चिमाण्णा यांच्या सर्व वारसांना रेकॉर्ड वर घेणे व त्यांना पुराव्याची संधी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे जर प्रतिवादी नं.१७ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेण्यासाठी जो विलंब झालेला आहे तो माफ केला नाही, तसेच त्यांच्या वारसांविरुध्द अबेटमेंटचा हुकुम रद्द केला नाही तर त्यांचेविरुध्दची केस आपोआप संपुष्टात येईल व प्रतिवादी नं.१७ यांच्या वारसावर अन्याय होईल व त्यांना आर्थीक नुकसानीस सामोरे जावे लागेल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. वादी यांचा नि.१२३ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

३. खर्चाबद्दल आदेश नाही.

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.04.11 11:28:52 +0530

**ठिकाण –सांगली.** **(अभय अ. मेहेंदळे)**
**दिनांक–१०.०४.२०२३** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **१०.०४.२०२३** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **११.०४.२०२३** |